## २८ वर्षांपासून थेट भरतीच नाही : पदोन्नतीनेच भरली जातात पदे

# दुय्यम निबंधकांची स्पर्धा परीक्षांद्वारे भरती करण्यास आडकाठी

दीपक जाधव ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील दुय्यम निबंधकांची (गट ब) निम्मी पदे ही राज्यसेवा आयोगामार्फत भरणे आवश्यक असताना गेल्या २८ वर्षांपासून स्पर्धा परीक्षा घेऊन या पदांची भरती प्रक्रियाच राबविण्यात आलेली नाही. केवळ पदोन्नतीने किंवा अतिरिक्त कार्यभार देऊन ही पदे भरली जात आहेत. मुद्रांक शुल्क विभागात कार्यरत असलेल्या लॉबीकडून आयोगामार्फत ही पदे भरण्यास आडकाठी केली जात आहे.

नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागामध्ये दुय्यम निबंधकांची (गट ब) ६०० पेक्षा जास्त पदे आहेत. यातील निम्मी पदे थेट भरती प्रक्रियेद्वारे व निम्मी पदे पदोन्नतीने भरली जाणे अपेक्षित आहे. त्यानुसार राज्यसेवा आयोगामार्फत दुय्यम निबंधकांची (गट ब) ३०० पदे भरली जाणे अपेक्षित आहे. मात्र या पदांवर पदोन्नतीने कर्मचाऱ्यांची वर्णी लावली जावी, यासाठी राज्यसेवा आयोगामार्फत ही भरती होऊ दिली जात नाही. सन १९९५ मध्ये महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळामार्फत दुय्यम निबंधक गट ब च्या पदांच्या रिक्त जागांची थेट भरती झाली होती, त्यानंतर गेल्या २८ वर्षांत या पदांची थेट भरती झालेली नाही.

राज्यात लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत आहेत, गेल्या काही दिवसांत राज्यसेवा आयोगामार्फत निघणाऱ्या जागांमध्ये घट होत आहे. नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील दुय्यम निबंधक पदाची जागा अनेक वर्षांपासून भरल्या न गेल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजीची भावना आहे.

निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त जबाबदाऱ्या देऊन सध्या कामकाज चालविले जात आहे. मात्र त्याचा मोठा परिणाम मुद्रांक शुल्क विभागाच्या कामकाजावर होत आहे. नियमानुसार निम्मी पदे स्पर्धा परीक्षांद्वारे थेट भरती करुन भरली गेल्यास नव्या दमाचे तरुण अधिकारी उपलब्ध होऊ शकतील. मात्र जाणीवपूर्वक ही पदभरती करण्यास आडकाठी केली जात आहे.

राज्यसेवा आयोगाकडून दरवर्षी उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, सहायक विक्रीकर आयुक्त, उपनिबंधक सहकारी संस्था, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी), महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट अ, मुख्याधिकारी, नगरपालिका/परिषद, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क- गट अ, तहसीलदार-गट अ, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी- गट ब, मुख्याधिकारी नगरपालिका आदी विविध पदे दरवर्षी जाहिरात प्रकाशित करुन भरली जातात. मात्र यातून दुय्यम निबंधकांचे भरती वगळण्यात आली आहे.

### मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण



1 दुय्यम निबंधक गट-ब या पदांच्या थेट भरतीला २०१३ मध्ये मान्यता देण्यात आली. राज्यसेवा आयोगाने ही भरती प्रक्रिया राबविण्याबाबत त्यांना कळविण्यातही आले होते. मात्र, अचानक त्याला स्थगिती देण्यात आली. दुय्यम निबंधक पदांची थेट भरती प्रक्रिया राबवू नये, ही पदे केवळ पदोन्नतीनेच भरली जावीत यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील मोठी लॉबी कार्यरत आहे.

2 यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण करण्यात आल्याचा आरोप स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी केला आहे.

"अनेक दिवसांपासून प्रतीक्षा गेल्या ७-८ वर्षांपासून मी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांची तयारी करीत आहे. मागील वर्षी केवळ ६९ जागांची जाहिरात प्रसिद्ध झाली होती. यावर्षी त्यामध्ये थोडीशी वाढ झाली असली तरी जागांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. मुद्रांक शुल्क विभागातील दुय्यम निबंधक पदाची जाहिरात गेल्या अनेक वर्षांपासून काढण्यात आलेली नाही. याप्रमाणे आणखीही काही विभागांमध्ये जाणीवपूर्वक या पदांच्या भरती प्रक्रिया थांबविण्यात आल्या आहेत. केवळ पदोन्नतीने ही पदे भरली जावीत यासाठी हे केले जात आहे. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची अभ्यास करता करता वयोमर्यादा उलटून चालली आहे.

**- कैलास शिंदे**, स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारा विद्यार्थी

Pune Main
Powered by: erelego.com
महाराष्ट्र लोकसेवा आयोग : ग्रंथालय दैनिक वर्तमानपत्र कात्रण सेवा